जा.क्र.प्राफसंकें/हॉर्टसॅप/2496/२०२३
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग
दिनांक : 07 NOV 2023

प्रति,

.................................
.................................
.................................

**विषय** :— खाजगी वाहन भाडे तत्वावर घेणेकरीता दरपत्रक पुरविणेबाबत....

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला अंतर्गत **''फलोत्पादन पिकांवरील किड–रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प''** या योजनेअंतर्गत आंबा व काजू बागांचे किड व रोगाचे सर्वेक्षणाकरीता खाजगी वाहन भाडे तत्वाने घ्यावयाची असून आपणास विनंती करण्यात येते की, खालील तपशिलाप्रमाणे खाजगी वाहन भाडे तत्वाने पुरवू इच्छित असल्यास त्याबाबतचे दरपत्रक खाली सही करणार यांचे नावे मोहोरबंद लखोटयातून दि. १६/११/२०२३ दुपारी १२:०० पर्यंत या कार्यालयास पोहोचेल अशा रितीने पाठवावे. लिफाफ्यावर **''खाजगी वाहन भाडे तत्वाने घेणे दरपत्रक'' प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला (काजू प्रक्षेत्र)** असा उल्लेख असावा.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति कि. मी. |
|---|---|---|
| १. | इन्होवा, इर्टिगा, टवेरा, टाटा सुमो (Non AC) | |
| २. | इन्होवा, इर्टिगा, टवेरा, टाटा सुमो (AC) | |

**अटी व शर्ती :**

१. दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
२. दरपत्रकावर खाजगी वाहन भाडे तत्वाने घेणेबाबतचे दरपत्रक (काजू प्रक्षेत्र) असा उल्लेख असावा.
३. दरपत्रक अंतिम तारखेनंतर या कार्यालयात पोहोच झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
४. दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचे अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवले आहते.
५. ठरलेल्या दरा व्यतिरिक्त आपणांस कुठलाही भत्ता किंवा आकार देण्यात येणार नाहीत.
६. आपल्या वाहनाचे सर्व लाईट (कार टाईप) शक्यतो पाच वर्षापेक्षा जादा जुनी नसावीत.
७. वाहनाचा मेन्टेनन्स खर्च, इतर खर्च तसेच वाहनाचा अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पूरवठादाराची राहील.
८. वाहन नादुरूस्त, खराब अपघातग्रस्त झाल्यास लगेचच दुसरे बदली वाहन पुरविण्याची जबाबदारी पूरवठादाराची असेल.
९. वाहनाचे तसेच चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, पीयूसी, चालकाची अनुज्ञप्ती व बॅच इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.
१०. टोल व पार्किंग चार्जेस पूरवठादाराने भरावयाचे आहेत.
११. पुरवठादाराने झालेल्या प्रवासाचे देयक उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदूर्ग यांनी निर्देशित केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून या कार्यालयास निम्नस्वाक्षरीकार यांचे नावे ३ दिवसांचे आत सादर करावे जेणेकरुन देयकाची अदायगी करणे सुलभ होईल.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग